**ठळक बातम्या**

- भारतरत्न डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांना १३४ व्या जयंतीनिमित्त देशभरातून अभिवादन

- गुजरातजवळ अरबी समुद्रातून अठराशे कोटी रुपयांचे अंमली पदार्थ जप्त

- फरार हिरे व्यापारी मेहुल चौकसीला बेल्जियममध्ये अटक

**आणि**

- आयपीएलमध्ये आज लखनऊ सुपर जायंट्स आणि चेन्नई सुपर किंग्ज यांच्यात सामना

**<><><><><><>**

भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या १३४ व्या जयंतीनिमित्त राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू, उपराष्ट्रपती जगदीप धनखड, प्रधानमंत्री नरेंद्र मोदी, लोकसभा अध्यक्ष ओम बिर्ला, राज्यसभेचे उपसभापती हरिवंश, राज्यसभेतले सभागृह नेते जे. पी. नड्डा, राज्यसभेतले विरोधी पक्षनेते मल्लिकार्जुन खरगे, लोकसभेतले विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांनी संसद भवन संकुलातल्या आंबेडकर यांच्या पुतळ्याला आज अभिवादन केलं. तसंच, केंद्रीय मंत्री, संसद सदस्य, दिल्लीच्या मुख्यमंत्री रेखा गुप्ता तसंच विविध राजकीय पक्षांच्या नेत्यांनीही डॉ. आंबेडकर यांना अभिवादन केलं.

**<><><><><><>**

जीवनातल्या असंख्य अडचणींवर मात करून बाबासाहेबांनी स्वतःची एक वेगळी ओळख निर्माण केली आणि आपल्या कर्तृत्वामुळे जगभरात आदराचं स्थान प्राप्त केलं, असं राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी आपल्या संदेशात म्हटलं आहे.

बहुआयामी व्यक्तिमत्त्व असलेले बाबासाहेब हे अर्थ, शिक्षण, कायदे या विषयातले तज्ञ होते. तसंच, ते समतावादी समाजाचे पुरस्कर्ते आणि महान समाजसुधारक होते, असंही मुर्मू आपल्या संदेशात म्हणाल्या आहेत.

डॉ. आंबेडकर यांच्या प्रेरणेमुळेच आज देश सामाजिक न्यायाचं स्वप्न साकार करू शकत आहे. बाबासाहेबांची तत्वं आणि त्यांचे आदर्श स्वावलंबी आणि विकसित भारताच्या निर्मितीला बळ आणि गती देतील, असं प्रधानमंत्री नरेंद्र मोदी आपल्या संदेशात म्हणाले आहेत.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार होते. कोट्यवधी दलित आणि इतर मागास समुदायांसाठी ते भारतातचं नव्हे तर जगभरात आशा, स्वाभिमान आणि सामाजिक न्यायाचं मूर्तिमंत प्रतीक म्हणून ओळखले जातात, अशा शब्दांत महाराष्ट्राचे राज्यपाल सी. पी. राधाकृष्णन यांनी बाबासाहेबांना आदरांजली वाहिली आहे.

एकसंध भारताचं श्रेय बाबासाहेबांना द्यावं लागेल. त्यांनीच लिहिलेल्या संविधानाची ७५ वर्षं पूर्ण होत आहेत. चुकीच्या रुढी परंपरांमधून देशाला बाहेर काढून सर्वांना समान अधिकार त्यांनी मिळवून दिला, असं मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले. संविधानाचं विकसित भारतात सगळ्यात महत्त्वपूर्ण योगदान आहे, भारताचं संविधान आपल्यासाठी सर्वोच्च स्थानी असल्याचं फडणवीस यांनी आपल्या संदेशात म्हटलं आहे.

**<><><><><><>**

बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीनिमित्त आज देशभरात विविध ठिकाणी कार्यक्रमांचं आयोजन करण्यात येत आहे. मध्य प्रदेशात महू इथे विशेष कार्यक्रमाचं आयोजन करण्यात आलं आहे. मुख्यमंत्री डॉ. मोहन यादव हे देखील या कार्यक्रमात सहभागी होणार असून यावेळी त्यांच्या हस्ते पुस्तकाचं प्रकाशन आणि भीमरत्न पुरस्कार प्रदान करण्यात येतील. भारतीय जनता पक्षातर्फे आजपासून २५

एप्रिलपर्यंत राज्यव्यापी कार्यक्रमांचं आयोजन करण्यात आलं आहे. भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची १३४ वी जयंती आज मुंबईत मोठ्या उत्साहात साजरी होत आहे. जयंतीनिमित्त मुंबईच्या चैत्यभूमीवर राजकीय नेत्यांसह भीम अनुयायी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना अभिवादन करण्यासाठी पहाटेपासून गर्दी झाली आहे. जयंतीनिमित्त राज्याचे राज्यपाल सी. पी. राधाकृष्णन, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री अजित पवार आणि महायुतीच्या मंत्र्यांनी देखील चैत्यभूमीला भेट देऊन डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना अभिवादन केलं आहे. यावेळी बोलताना मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले…

**होल्ड - मुख्यमंत्री बाइट....**

**<><><><><><>**

हरियाणातल्या हिसार विमानतळावरून अयोध्येसाठी व्यावसायिक विमानसेवेचा प्रारंभ तसंच विमानतळाच्या टर्मिनल २ च्या कामाची कोनशिला ठेवण्याचा कार्यक्रम आज प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या हस्ते झाला. या नवीन टर्मिनलसाठी ४१० कोटी रुपयांचा खर्च अपेक्षित असून त्यात अत्याधुनिक प्रवासी टर्मिनल, मालवाहतुकीसाठी स्वतंत्र व्यवस्था आणि हवाई वाहतूक नियंत्रणासाठी इमारतीचा समावेश आहे.

यावेळी प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांची जाहीर सभा झाली. सर्वसमावेशक विकासासाठी केंद्र सरकार वचनबद्ध असल्याची ग्वाही दिली. डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीनिमित्तानं प्रधानमंत्री मोदी यांनी आदरांजली वाहिली. यावेळी ते म्हणाले…

**होल्ड - प्रधानमंत्री....**

**<><><><><><>**

अरबी समुद्राजवळ भारतीय सागरी सीमेजवळ गुजरात दहशतवाविरोधी पथक आणि भारतीय तटरक्षक दलाने काल पहाटे केलेल्या कारवाईत १ हजार ८००

कोटी रुपये किमतीचे ३०० किलो अमली पदार्थ जप्त करण्यात आले. मुद्देमाल गुजरात एटीएसकडे सोपवण्यात आला असून एटीएस या प्रकरणाची सखोल चौकशी करत आहे.

केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यानी या कारवाईबाबत भारतीय तटरक्षक दल आणि गुजरात पोलिसांचं अभिनंदन केलं आहे. सरकार अमली पदार्थांच्या व्यापाराचं जाळं मूळापासून उखडून टाकत आहे. अमली पदार्थमुक्त भारत करण्याच्या दिशेने हे एक महत्वाचं पाऊल असल्याचं ते शहा समाजमाध्यमावरच्या पोस्टद्वारे म्हणाले. महसूल गुप्तचर संचालनालयाने मिझोराममधे ५२ कोटी रुपयांपेक्षा जास्त किमतीचे ५२ किलो अमली पदार्थ जप्त केले आहेत. या कारवाईत दोघा जणांना अटक करण्यात आली आहे.

**<><><><><>**

सीबीआयच्या विनंतीवरुन फरार हिरे व्यापारी मेहुल चौकसी याला बेल्जियम पोलिसांनी शनिवारी अटक केली आहे. पंजाब नॅशनल बँकेतल्या साडे १३ हजार कोटी रुपयांच्या कर्ज फसवणूक प्रकरणी त्याच्याविरोधात मुंबईतल्या न्यायालयानं अटक वॉरंट जारी केलं होतं. याप्रकरणातला दुसरा आरोपी नीरव मोदीचं लंडनमधून प्रत्यार्पण व्हायचं आहे. घोटाळा उघड होण्याच्या काही दिवस आधी, जानेवारी २०१८ मध्ये तो देशाबाहेर पळून गेला होता.

चौकसी याची अटक हे मोठं यश आहे. गरीबांचे पैसे लुटणाऱ्यांना, हे पैसे परत करावेच लागतील, असं प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी यापूर्वीचं स्पष्ट केलं असल्याचं केंद्रीय अर्थ राज्यमंत्री पंकज चौधरी म्हणाले.

**<><><><><>**

आयपीएल टी २० क्रिकेटमध्ये, आज लखनऊ सुपर जायंट्स चा सामना चेन्नई सुपर किंग्ज बरोबर होणार आहे. लखनऊच्या एकाना क्रिकेट स्टेडियमवर आज संध्याकाळी ७:३० वाजता हा सामना सुरू होईल. मुंबई इंडियन्सने काल

दिल्ली कॅपिटल्सचा १२ धावांनी पराभव केला तर  रॉयल चॅलेंजर्स बेंगळुरूने ९ गडी राखून राजस्थान रॉयल्सवर दणदणीत विजय मिळवला.

<><><><><>

चीनमध्ये मकाऊ इथे सुरू असलेल्या ITTF टेबल टेनिस विश्वचषक २०२५ या स्पर्धेत महिला एकेरी गटात भारताच्या मनिका बत्रा आणि श्रीजा अकुला यांनी पहिल्या फेरीत विजय मिळवला आहे.

<><><><><>

स्मार्टफोन, कम्प्युटर, सेमीकंडक्टर आणि त्यांच्या सुट्या भागांवर येत्या १-२ महिन्यात अमेरिका स्वतंत्र आयात शुल्क लावणार आहे. औषधी उत्पादनांच्या आयातीवरचे, विशेषतः चीनमधून होणाऱ्या आयातीवरचे शुल्क वाढवण्याचाही अमेरिकेचा विचार आहे. अमेरिकेचे वाणिज्य मंत्री हॉवर्ड लुटनिक यांनी काल ही माहिती दिली. दोन दिवसांपूर्वी काही इलेक्ट्रॉनिक उपकरणांना आयात शुल्कातून वगळण्याचा निर्णय अमेरिकेनं जाहीर केला होता. या उपकरणांच्या चिप आणि टीव्हीचे भाग दक्षिण आशियाई देशातून आयात करण्याऐवजी अमेरिकेतच उत्पादित करण्याची गरज त्यांनी व्यक्त केली.

<><><><><>

भारतीय माहिती सेवेतले निवृत्त अधिकारी पार्था घोष यांचं आज सकाळी कोलकात्यात निधन झालं. गेल्या काही दिवसांपासून ते आजारी होते. आकाशवाणी, दूरदर्शन, केंद्रीय संचार ब्युरो, पीआयबी याठिकाणी त्यांनी काम केलं होतं.

//<><><><><>//